**जनसंपर्क अधिकारी**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट-२९५/२०२२** **दिनांक : ०३/१०/२०२२**

# मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे द्वितीय वर्धापनाच्या औचित्यावर विविध उपक्रमांचे आयोजन.

दिनांक १/१०/२०२२ रोजी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेस दोन वर्ष पुर्ण झाल्याने दिनांक १/१०/२०२२ ते ७/१०/२०२२ पावेतो पोलीसांचे वतीने रक्तदान शिबीर, नशामुक्ती करिता जनजागृती कार्यक्रम, आरोग्य शिबीर, वृध्दाश्रमांना भेटी, विद्यार्थी व नागरिकांना कायदेविषयक माहिति होण्यासाठी जनगजागृती अभियान, वाहतूक नियमनाकरिता जनजागृती अभियान अशाप्रकारचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने आज दिनांक ३/१०/२०२२ रोजी आचोळे पोलीस ठाणे यांच्या वतीने जे बी एस स्कूलमधील विद्दार्थी व पोलीसांनी संयुक्तनगर-चंदननाका-संगम मेडिकल-सनशाईन-अल्कापुरी अशी नशामुक्ती प्रभात फेरी काढण्यात आली. त्याचप्रमाणे एस. के. सी. स्कूल, आचोळे डोंगरी नालासोपारा पूर्व येथील विद्यार्थ्यांना महिला विषयक कायदे, सायबर गुन्हे, महिलांनी आत्मरक्षण कसे करावे तसेच पोलीसांच्या डायल-११२ या प्रणालीबाबत जनजागृती करुन मार्गदर्शन केले.




**आचोळे पोलीस ठाणेचे वतीने आयोजीत रॅली व शाळेमधील मार्गदर्शन शिबीर**

वसई पोलीस ठाणे यांच्या वतीने हुजेफा कॉलेज, कोळीवाडा येथिल विद्यार्थ्यांना नशेचे दुष्परिणाम व नशामुक्ती या विषयांवर मार्गदर्शनपर शिबीर आयोजति करण्यात आले होते. सदरवेळी नशामुक्ती या विषयावर श्री विजय मेहता, कृपा फांऊडेशन काऊंसलर यांनी मार्गदर्शन केले असून सदरवेळी कॉलेजचे १५० विद्यार्थी हजर होते.





**वसई पोलीस ठाणे यांचे वतीने हुजेफा कॉलेज येथील आयोजित नशामुक्ती मार्गदर्शन कार्यशाळा.**

माणिकपुर पोलीस ठाणे येथील कार्यरत पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्याकरिता वेलनेस कोच व दुमना चॅरिटेबल ट्रस्ट यांचे मार्फतीने आरोग्यवर्धक व्याख्यान व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमादरम्यान तणावपूर्ण जीवन, वाढलले वजन कमी करणे तसेच योग्य आहार कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी पोलीस अधिकारी/अंमलदार, होमगार्ड तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान उपस्थित होते.





**माणिकपुर पोलीस ठाणे येथे आयोजीत आरोग्य मार्गदर्शन व्याख्यानातील क्षणचित्रे.**